<u>मानव विकास कार्यक्रम</u>
उत्पन्नवाढीच्या नवीन योजनेला मंजूरी-चंद्रपूर जिल्हयात समूह कुक्कुट संमिलित विपणन कार्यक्रम ही नवीन योजना पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविणे.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः माविका-२०१७/प्र.क्र.११/का.१४१८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ३ ऑक्टोबर , २०१७

<u>वाचा</u> १. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: माविमि-२०१०/प्र.क्र.८१/ का-१४१८, दि.१९ जुलै, २०११
२. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र माविका-२०१२/प्र.क्र.६९/का.१४१८,दि.१२ जुलै,२०१२.
३. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: माविका-२०१३/प्र.क्र.०४/का.१४१८ दि.२४ जुलै,२०१३
४. आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, औरंगाबाद यांचे पत्र क्र. जा.क्र.२०१७/माविआ/ तास्पेयो/ कुसंविका/कावी-४७५, दिनांक १९/०७/२०१७.

<u>प्रस्तावना :</u>

महाराष्ट्र राज्यातील २३ जिल्ह्यातील अति मागास १२५ तालुक्यांत मानव विकास कार्यक्रम सन २०११-१२ पासून राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमांतर्गत आरोग्य, शिक्षण व उत्पन्नवाढ या बाबींशी संबंधित विविध योजना निवडलेल्या १२५ तालुक्यातील ग्रामिण भागात व ‘क’ वर्ग नगरपालिकांमध्ये राबविण्यात येत आहे.

२. मानव विकास कार्यक्रमांतर्गत उत्पन्नवाढीच्या योजने अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात “पथदर्शी प्रकल्प” म्हणून “समूह कुक्कुट संमिलित विपणन कार्यक्रम” ही नवीन योजना राबविण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>

३. मानव विकास कार्यक्रम अंतर्गत सध्या राबविण्यात येत असलेल्या योजनेव्यतिरिक्त उत्पन्नवाढी विषयक "**समूह कुक्कुट संमिलित विपणन कार्यक्रम**" ही नवीन योजना सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीकरीता राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेमुळे चंद्रपूर जिल्ह्यात आदिवासी, मागास व अत्यल्प उत्पन्न गटातील महिलांना पूरक रोजगाराचे साधन उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल व त्यायोगे मानव विकास निर्देशांक वाढणेस मदत होणार आहे. या योजने अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात “पथदर्शी प्रकल्प” च्या अंमलबजावणीसाठी सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून “टाटा ट्रस्ट”यांचा सहभाग व त्यांच्याकडून काही प्रमाणात वित्त सहाय्य प्राप्त होणार आहे. हा “पथदर्शी प्रकल्प” चंद्रपूर जिल्ह्यातील मूल, पोंभुर्णा व गोंडपिंपरी या तालुक्यांमध्ये राबविण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

४. चंद्रपूर जिल्ह्यात “पथदर्शी प्रकल्प” म्हणून "**समूह कुक्कुट संमिलित विपणन कार्यक्रम**" संबधित सविस्तर तपशील **परिशिष्ट -अ** मध्ये तर बाबनिहाय अपेक्षित खर्च **परिशिष्ट -ब** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

५. चंद्रपूर जिल्ह्यात राबविण्यात येणा-या पथदर्शी प्रकल्पावरील खर्च "मागणी क्र.ओ-१, २०५३, जिल्हा प्रशासन, ०९३ जिल्हा आस्थापना, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०४ आयुक्त, औरंगाबाद (०४) (०१) मानव विकास निर्देशांक वृध्दी करणे (२०५३१२३१), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) " या लेखाशीर्षाखालील प्रती वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१७१००३१०३२४९७५१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nagnath Bhoge

Digitally signed by Nagnath Bhoge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=04af0bc93e24f1a21d1970548d847e3eb4a9b690302fb614fee7642b518f5870, cn=Nagnath Bhoge
Date: 2017.10.03 16:07:29 +05'30'

(नागनाथ भोगे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) शासनाचे मुख्य सचिव,

२) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

३) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,

४) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,

५) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,

६) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,

७) आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, बाबा पेट्रोलपंपजवळ, अदालत रोड, औरंगाबाद

८) उपसचिव (का. १४२६/१४२७), नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई

९) विभागीय आयुक्त, (सर्व)

१०) जिल्हाधिकारी, (सर्व)

११) मुख्य कार्यकारी अधिकारी,(सर्व)

१२) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय

१३) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.

१४) अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन, मुंबई.

१५) उपायुक्त, नियोजन, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व)

१६) जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)

१७) जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)

१८) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, (सर्व)

१९) नियोजन विभागातील सर्व सह सचिव/उपसचिव

२०) निवड नस्ती (का.१४१८), नियोजन विभाग

****

शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.: माविका-२०१७/प्र.क्र.११/का.१४१८ , दि. ३ ऑक्टोबर, २०१७ सोबतचे परिशिष्ट

परिशिष्ट -अ

योजनेचे नांव- समूह कुक्कुट संमिलित विपणन कार्यक्रम (पथदर्शी योजना)

(अ) स्वरुप व उद्देश :

आदिवासी मागास व अत्यल्प उत्पन्न गटातील महिलांना रोजगाराचे साधन उपलब्ध करणे व उत्पन्न वाढ होण्यास मदत करुन त्यांना स्वयंपूर्ण बनविणे हा योजनेचा प्रमुख उद्देश असून यातून पुढील उद्दिष्ट साध्य करण्यात येतील.

१. बेरोजगार ग्रामीण आदिवासी महिला बचतगटाची निर्मिती .
२. गटांच्या समूहातुन सहभागी तत्वावर उत्पादक कंपनीची स्थापना.
३. एकदिवसीय कुक्कुट पक्षी संगोपन व तद्नंतर विक्री.
४. विक्रीच्या प्राप्त नफ्यातून लाभार्थ्यांना लाभांश वाटप.
५. कंपनीचे जंगम व खेळत्या भांडवलात वाढ करणे.

(ब) अपेक्षित खर्च :

a) “पथदर्शी प्रकल्प” करीता सन २०१७-१८ ते २०१९-२० पर्यंत एकूण रु. १५५०.१० लक्ष खर्च अपेक्षित असून यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा रु. १२००.०० लक्ष, टाटा ट्रस्टकडून मिळणारे अनुदान रु. ३००.१० लक्ष तसेच लाभार्थी कर्जाची रक्कम रु. ५०.०० लक्ष असा राहील. तपशीलवार अपेक्षित खर्च **परिशिष्ट ब** मध्ये दर्शविण्यांत आला आहे.

b) “पथदर्शी प्रकल्प” चा कालावधी हा ३ वर्षांचा राहील. या कालावधीत पहिल्या,दुस-या व तिस-या वर्षात अनुक्रमे ३००, ४०० व ३०० अशा एकूण १००० लाभार्थी (नवीन उत्पादक) यांना या प्रकल्पात समाविष्ट करुन घेण्यात येईल.

(क) अंमलबजावणी व सनियंत्रण

पथदर्शी प्रकल्पची प्रभावी अंमलबजावणी व संनियत्रण यासाठी खालीलप्रमाणे जिल्हा स्तरावर संयुक्त जिल्हा स्तरीय सुकाणू समिती (Joint District Level Steering Committee) गठित करण्यात यावी:

१)	जिल्हाधिकारी, चंद्रपूर	अध्यक्ष
२)	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर	सहअध्यक्ष
३)	अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर	सदस्य
४)	प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,चंद्रपूर	सदस्य
५)	जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद,चंद्रपूर	सदस्य
६)	टाटा ट्रस्ट यांनी निश्चित केलेला प्रतिनिधी	सदस्य
७)	जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास), चंद्रपूर	सदस्य
८)	जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, चंद्रपूर	सदस्य सचिव

****

शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.: माविका-२०१७/प्र.क्र.११/का.१४१८ , दि. ३ ऑक्टोबर, २०१७ सोबतचे परिशिष्ट

परिशिष्ट -ब

अपेक्षित खर्च

(रक्कम रुपये)

अनु.क्र.	बाबनिहाय	लाभार्थी	२०१७-१८	२०१८-१९	२०१९-२०	एकूण	हिस्सा(%)	खर्च वाटप		
								राज्य शासन	टाटा ट्रस्ट	इतर
अ	**उत्पादक पातळीवर**									
i	प्रक्षेत्र उभारणे	उत्पादक	३,००,००,०००	४,००,००,०००	३,००,००,०००	१०,००,००,०००	६४.५	१०,००,००,०००		
ii	प्रशिक्षण व प्रात्यक्षिक	NSPDT*	९,००,०००	१२,००,०००	९,००,०००	३०,००,०००	१.९		३०,००,०००	
ब	**सार्वजनिक पातळीवर**									
i	सामुहिक स्वरुपाचा खर्च	PC**	१,०९,००,०००	१,२०,००,०००	९०,००,०००	३,१९,००,०००	२०.६	२,००,००,०००	६९,००,०००	५०,००,०००
ii	प्रकल्प कार्यालय स्थापना खर्च	NSPDT	६,००,०००			६,००,०००	०.४		६,००,०००	
iii	मागास एकीकरण	PC								
क	**योजना कार्यान्वीत करण्यासाठी होणारा खर्च**									
i	यंत्रणा राबविण्याचा चमुचा खर्च	NSPDT	३०,२१,६००	३३,२३,७६०	३६,५६,१३६	१,००,०१,४९६	६.५		१,००,०१,४९६	
ii	उत्पादकांना एकत्रित महसूली सहाय्य	NSPDT	२८,७२,८००	३१,६०,०८०	३४,७६,०८८	९५,०८,९६८	६.१		९५,०८,९६८	
			४,८२,९४,४००	५,९६,८३,८४०	४,७०,३२,२२४	१५,५०,१०,४६४	१००	१२,००,००,०००	३,००.१०,४६४	५०,००,०००
	** National Smallholder Poultry Development Trust* *** producer Company*									
	खर्च वाटप टक्केवारी							७७.४	१९.४	३.२